ePaper
वर्ष - 8 । अंक -75
UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com
रविवार, दिनांक 22 सप्टेंबर 2024
पुणे आवृत्ती
mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बळीराजासाठी नव्या घोषणा, उत्पादकांच्याही उंचावल्या आशा



## आतील पानांत

- बॅटची पूजा करुन पंत मैदानात उतरला
- रोहितने बोलता बोलता शुबमनला मारलं
- मुख्यमंत्रिपदी आतिशी विराजमान!
- 'तुझ्या मित्रांमुळे धार्मिक तणाव'

## मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना बंद व्हावी म्हणून काँग्रेसने घेतली कोर्टात धाव

# "तुमच्या वडिलांची योजना आहे का?"

### लाडकी बहीण योजना बंद करण्याच्या याचिकेवरून अजित पवारांचा काँग्रेसवर संताप

**। मुंबई । महाईन्यूज**

**महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये दिले जात आहेत. जुलै महिन्यापासून ही योजना सुरू केली असून आतापर्यंत दीड कोटीहून अधिक महिला पात्र ठरल्या आहेत. त्यापैकी कोट्यवधी महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचा निधीही जमा झाला आहे. मात्र, आता योजनावरून महाविकास आघाडीने टीका केली आहे. तर ही योजना बंद व्हावी याकरता काँग्रेसने कोर्टात धाव घेतली आहे. यावरून राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संताप व्यक्त केलाय. ते जन सन्मान यात्रेनिमित्त चिपळून येथे बोलत होते.**



"गोर गरिबांना आम्ही मदत करतो. पण सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेले लोक याची चेष्टा करतात. काँग्रेसवाले म्हणतात आम्ही योजना बंद करू. का तुमच्या बापाच्या घरची योजना आहे का? हा जनतेचा पैसा आहे. मला बाप काढायचा नव्हता. तुमच्या वडिलांच्या घरची योजना आहे का?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

"शासकीय योजनांची पूरक माहिती देण्यासाठी आम्ही ही जन सन्मान यात्रा राज्यभर काढली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून मायमाऊलींना आम्ही जे पैसे देत आहोत, ते पुढेही सुरूच राहतील. त्यात कुठेही खंड पडणार नाही, असा शब्द देतो. आपलं घर मोठ्या कष्टानं चालवणाऱ्या भगिनींना सक्षम आणि सबल करण्यासाठी आम्ही ही योजना आणली.

जनतेचा पैसा आम्ही जनतेला देत आहोत, त्यातून स्थानिक व्यावसायिकांना सुद्धा फायदा होतोय. अनेक शासकीय योजना सर्व समाज घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही राज्यभर राबवत आहोत. या योजना दीर्घकाळ सुरू ठेवण्यासाठी विधानसभा निवडणुकीत आम्हाला भक्कम पाठिंबा द्या, अशी विनंती करतो", असंही अजित पवार म्हणाले.

### ...तर महायुतीचं सरकार निवडून आणा

"महिलांना खूप काही कळतं. कारण महिला घरात राबराब राबते. सर्वांत आधी घरात कोण उठते. पुरुष माणसं आले की त्यांना लगेच जेवायला देतात. पण घर कोण बंद करणार. आहे ना बायको? तू काय करतो? तू फक्त झोपा काढतो. २४ तासांत माझी माय माऊली, मुलगी खूप काम करते. मग त्यांना काही मिळायला नको का.. पण काहीजण कोर्टात गेले. विरोधकांनी कोर्टात जावं? माझी तुम्हाला विनंती आहे की ही योजना पुढे पाच वर्षे चालवायची असेल तर महायुतीचं सरकार पुन्हा आलं पाहिजे", असं अजित पवार म्हणाले.

## ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात भरलेल्या अर्जाचे पैसे कधी येणार?

### लाडकी बहीण योजनेबाबत फडणवीसांनी दिली माहिती

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



महाराष्ट्र सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी महाराष्ट्रातील कोट्यवधी महिलांनी अर्ज भरले आहेत. तसंच, अनेक पात्र महिलांच्या खात्यावर पैसेही जमा झाले आहेत. सप्टेंबर महिन्यातही अर्ज करण्यासाठी सरकारने मुदतवाढ दिली आहे. परंतु, ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात आणि सप्टेंबरमध्ये अर्ज केलेल्या महिलांना कधी पैसे मिळणार याबाबत सरकारकडून अद्याप स्पष्टता करण्यात आलेली नाही. यावरून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली आहे. नागपूर येथे आयोजित केलेल्या बांधकाम कामगार मेळाव्यात ते बोलत होते.

"वर्षाला अकरा हजार रुपये म्हणजेच महिन्याला दीड हजार रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यात देत आहोत. ज्यांचे ऑगस्ट महिन्यात शेवटच्या आठवड्यात ऑगस्ट आणि सप्टेंबरचे पैसे या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात देऊ. तसंच, ऑक्टोबर नोव्हेंबरमध्येही पैसे देऊ", अशी माहिती आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. दरम्यान, काँग्रेसने या योजनेला कडाडून विरोध केल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही संताप व्यक्त केला. ठगोरगरिबांना आम्ही मदत करतो. तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेली त्यांची पोरं. काँग्रेसवाले म्हणतात की आम्ही ही योजना बंद करू. हे त्यांच्या बापाच्या घरचं आहे. मला बाप काढायचा नव्हता. पण तुमच्या वडिलांच्या घरचं आहे?", असा प्रश्न त्यांनी विचारला.

### योजना बंद करणार नाही

"काँग्रेस कोर्टात गेलंय. आम्ही कोर्टात सांगितलंय की या योजनांसाठी आम्ही बजेटमध्ये पैसा ठेवलेला आहे. आम्ही हवेत योजना आणलेल्या नाहीत. आधीच्या योजनांना स्थगिती दिलेली नाही. काँग्रेसने कितीही विरोध केला तरीही या योजना बंद होणार नाहीत, हा शब्द मी देतो", असं आश्वासनही देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.

### लाडकी बहीण योजना दीर्घकाळासाठी

"कोणतीही योजना एका रात्रीत जाहीर होत नाही. त्यामागे बरीच तयारी असते. अभ्यास करावा लागतो. या योजनेचा लाभ कुणाला द्यावा याचा सविस्तर अभ्यास करण्यात आला. केवळ दारिद्र्यरेषेखालील नागरिकांसाठी योजना असावी की सर्वसमावेशक असावी, त्यासाठी किती निधी लागेल या सर्व बाबींचा तपशीलवार विचार करण्यात आला. आम्हाला ही योजना दीर्घकाळ चालवायची आहे. त्यामुळे विचारपूर्वक, पूर्वतयारी करून निर्णय घेतला आहे".

# राजाने विरोधी विचार सहन केले पाहिजेत!

## हीच लोकशाहीची परीक्षा; गडकरींचा रोख कुणाकडे?, राजकीय वर्तुळात चर्चा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी ( NITIN GADKARI ) हे आपल्या स्पष्ट वक्तेपणामुळे नेहमीच चर्चेत असतात. आता त्यांनी पुण्यात केलेले एक विधान चांगलंच गाजतं आहे. त्यांनी केलेल्या त्या विधानाचे वेगवेगळे अर्थही राजकीय वर्तुळात लावले जात आहेत. लोकशाहीची सर्वात मोठी परीक्षा जर कोणती असेल तर राजाच्या विरुद्ध कितीही प्रखरपणे जर कुणी विचार मांडले तर राजाने ते सहन केलं पाहिजे.**



त्यांच्या या वक्तव्याचा रोख नेमका कोणाकडे याबाबत आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. यातील राजा कोण आणि प्रखर मत मांडणारे कोण याबाबतही वेगवेगळे तर्क काढले जात आहेत.सेक्युलर या शब्दाचा अर्थ धर्मनिरपेक्षता असा घेतला जातो. मात्र त्या शब्दाचा अर्थ हा सर्वधर्मसमभाव आहे असं नितीन गडकरी ( Nitin Gadkari ) म्हणाले. स्वामी विवेकानंदांनी शिकागोत जे विचारले ते महत्त्वाचे आहेत. माझा धर्म श्रेष्ठ हे सांगायला मी आलो नाही, माझा परमेश्वर श्रेष्ठ आहे हे सांगायला मी आलो नाही. तर तुमचा धर्म आणि तुम्ही जो परमेश्वर मानता तो श्रेष्ठ आहे हे सांगायला मी आलो आहे. आपली भारतीय संस्कृती आणि इतिहास ही आपल्याला मिळालेली देणगी आहे. सहिष्णुता हे आपलं वैशिष्ट्य आहे. ज्ञानेश्वरांनी पसायदानात सांगितलं आहे की विश्वाचं कल्याण झालं पाहिजे. आपण कधीही म्हटलेलं नाही माझं कल्याण होवो, विश्वाचं कल्याण होवो. दुसऱ्याच्या भविष्याबद्दल भावना व्यक्त करणं ही आपल्या संस्कृतीची विशेषता आहे. कुठल्याही धर्माची मूलभूत तत्त्व आहेत ती सारखीच आहेत. असं नितीन गडकरी ( Nitin Gadkari ) म्हणाले."लोकशाहीची सर्वात मोठी परीक्षा जर कोणती असेल तर राजाच्या विरुद्ध कितीही प्रखरपणे जर कुणी विचार मांडले तरीही राजाने ते सहन केले पाहिजे. त्या विचारांवर चिंतन केले पाहिजे. हीच खरी लोकशाहीमध्ये अपेक्षा आहे. माझी आई मला नेहमी सांगायची की निंदकाचे घर असावे शेजारी. आपल्याला दिशा देणारा आहे तो निंदा करणारा माणूस असतो. आपण जगातली सर्वात मोठी लोकशाही आहोत. लोकशाही चार स्तंभावर उभी आहे. या चारही स्तंभांचे अधिकार संविधानात आहेत. जे समाजाच्या हितासाठी आहे, देशहितासाठी आहे त्याप्रमाणे ते मांडण्याचं स्वातंत्र्य आपल्याला संविधानाने दिलं आहे." केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी पुणे येथे संत साहित्याचे गाढे अभ्यासक आणि माजी कुलगुरू डॉ एस एन पठाण यांच्या अमृत महोत्सवी गौरव ग्रंथ प्रकाशन कार्यक्रमात आले होते. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केले आहे. सध्याची राजकीय स्थिती पाहाता याचे वेगवेळे अर्थ काढले जात आहेत. गडकरी ( Nitin Gadkari ) हे प्रसंगी स्वतःच्या पक्षावर, पक्ष नेतृत्वावर आणि राजकीय स्थितीवर मनमोकळे भाष्य करण्याविषयी जाणले जातात. कुठलाही व्यक्ती हा धर्म, भाषा, प्रांत यामुळे मोठा होत नाही तर तो त्याच्या कर्तृत्वाने मोठा होतो असंही नितीन गडकरी म्हणाले. अंधारातलं वर्तन हे माणसाचं चरित्र आहे असंही नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. डॉ. पठाण यांना अडचणी आल्या असतील कारण त्यांनी परखडपणे त्यांनी विचार मांडले आहेत. स्वधर्म आणि अन्य धर्मातली टीका त्यांनी सहन केली असेल. पण त्याची चिंता न करता त्या विषयाबद्दल कटिबद्धता ठेवून त्यांनी सातत्याने विचार कायम ठेवला. राजकारणात जे होतं तसं आता झालं आहे पानी तेरा रंग कैसा जिसमें मिला हो वैसा असं झालं आहे.

### निंदकाचे घर असावे शेजारी

आपल्या देशात विचारभिन्नता ही समस्या नाही विचारशून्यता ही समस्या आहे. दुसऱ्याच्या भविष्याबद्दल भावना व्यक्त करणं ही आपल्या संस्कृतीची विशेषता आहे. कुठल्याही धर्माची मूलभूत तत्त्व आहेत ती सारखीच आहेत. असं नितीन गडकरी ( Nitin Gadkari ) म्हणाले."लोकशाहीची सर्वात मोठी परीक्षा जर कोणती असेल तर राजाच्या विरुद्ध कितीही प्रखरपणे जर कुणी विचार मांडले तरीही राजाने ते सहन केले पाहिजे. त्या विचारांवर चिंतन केले पाहिजे. हीच खरी लोकशाहीमध्ये अपेक्षा आहे. माझी आई मला नेहमी सांगायची की निंदकाचे घर असावे शेजारी. आपल्याला दिशा देणारा आहे तो निंदा करणारा माणूस असतो.

# अजितदादांच्या आमदाराबाबत जनतेत नाराजी

## महायुतीचा एक आमदार कमी होऊ नये यासाठी जागा सोडा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांच्याविषयी प्रचंड नाराजी असल्याचे सांगून शिवसेनेने पिंपरी विधानसभा मतदारसंघावर दावा केला आहे. त्यातच भाजपनेही पिंपरीत कमळावर लढणारा उमेदवार पाहिजे अशी मागणी केली आहे.**

त्यामुळे आमदार बनसोडे यांच्या अडचणीत भर पडली असून, पिंपरीच्या जागेवरून महायुतीतच रस्सीखेच निर्माण होण्याची शक्यता आहे. शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीन मतदारसंघापैकी पिंपरी अनुसूचित जातींसाठी (एससी) राखीव आहे. २००९ च्या पहिल्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे अण्णा बनसोडे तर, २०१४ मध्ये शिवसेनेचे गौतम चाबुकस्वार निवडून आले. २०१९ मध्ये पुन्हा बनसोडे राष्ट्रवादीकडून निवडून आले. पक्षातील फुटीनंतर त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला. 'ज्या पक्षाचा आमदार, त्या पक्षाला जागा' असे महायुतीचे सूत्र ठरल्याचे सांगितले जात असल्याने बनसोडे यांची उमेदवारी निश्चित मानली जात होती. परंतु, शिवसेनेने पिंपरीवर दावा सांगितला. त्यामुळे बनसोडे यांच्या अडचणीत भर पडली आहे.' राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अनेकजण इच्छुक आहेत. आमदार अण्णा बनसोडे यांच्याविषयी प्रचंड नाराजी आहे. महायुतीसाठी प्रत्येक जागा महत्त्वाची आहे.महायुतीचा एकही आमदार कमी होऊ नये, यासाठी पिंपरी मतदारसंघ शिवसेनेला मिळावा अशी आमची भूमिका आहे. शिवसेनेचा उमेदवार विजयी होईल. पिंपरीत पूर्वी शिवसेनेचा आमदार होता. हा मतदारसंघ शिवसेनेचा पारंपरिक मतदारसंघ आहे. या जागेची मागणी करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सूचित केले आहे,' असे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.



### बनसोडे यांच्याविषयी प्रचंड नाराजी

महायुतीच्या बैठकीत राष्ट्रवादीला जागा सुटली. तर, शिवसेना प्रामाणिकपणे प्रचार करणार आहे. लोकसभेला सेनापती एकीकडे आणि सैन्य दुसरीकडे असे राष्ट्रवादीकडून घडले. परंतु, विधानसभेला शिवसेनेकडून तसे होणार नाही. महायुतीचा धर्म पाळला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यावर आमदार बनसोडे म्हणाले, की शिवसेनेने दावा करणे उचित असून, तो त्यांचा अधिकार आहे. परंतु, महायुतीत ठरल्याप्रमाणे जागा राष्ट्रवादीलाच सुटणार असून मीच लढणार आहे. माझ्याबाबत नाराजी असल्याचे खासदार बारणे यांचे वैयक्तिक मत आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांच्याविषयी प्रचंड नाराजी असल्याचे सांगून शिवसेनेने पिंपरी विधानसभा मतदारसंघावर दावा केला आहे.

## मिशन विधानसभा निवडणूक

# पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी "परिवर्तन" करणारच!

### स्नेह मेळाव्यातून निर्धार : "परिवर्तना"च्या लढाईत महिला निभावणार महत्त्वाची भूमिका

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**वीज,पाणी, रस्ते यांसारख्या मूलभूत सुविधांची गैरसोय आहेच. मात्र महत्त्वाचे म्हणजे पिंपरी चिंचवड सारख्या औद्योगिक नगरीतून उद्योगधंदे बाहेर पडत आहे. शेजारच्या तळेगाव,चाकण एमआयडीसीमध्ये हीच परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्या पुढच्या पिढीचे भवितव्य सुरक्षित करायचे असेल तर "परिवर्तन" गरजेचे आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी आम्ही महिला पुढाकार घेणार असल्याचा निर्धार महिला शक्तीच्या एकजुटीने केला.**



संभाजीनगर येथील 'बर्ड व्हॅली' येथे वैशाली अजित गव्हाणे यांच्या पुढाकारातून गुरुवारी (दि. 19) महिलांसाठी स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला माजी नगरसेविका विनया तापकीर, संगीता ताम्हाणे, वैशाली उबाळे, मंदा आल्हाट, शांता आल्हाट, प्रियांका बारसे, स्वाती साने, शीतल मासुळकर, अश्विनी कांबळे, तृप्ती मोरे, मंगल खाडे, वैशाली वाळके, माया भालेकर, सपना साने, सीमा भालेकर, संगीता आहेर, स्वाती भालेकर , शुभांगी बोऱ्हाडे, शुभांगी लांडे, योगिता रणसुभे, प्रिया कोलते, संगीता जाधव, प्राजक्ता तापकीर, वैशाली तापकीर, स्मिता तापकीर, प्रतिभा तापकीर, ज्योती तापकीर, सृष्टी तापकीर, प्रणिता ताटे, कविता बुर्डे, वैशाली खेडकर आदी उपस्थित होत्या.

या मेळाव्यामध्ये स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनीही मार्गदर्शन केले. मेळाव्यामध्ये महिलांनी स्थानिक प्रश्नांपासून वाढलेल्या बेरोजगारी पर्यंतचे मुद्दे मांडले. या प्रश्नांवर तोडगा काढायचा असेल तर बदल गरजेचा आहे असे मत अनेक महिलांनी व्यक्त केले.

विनया तापकीर म्हणाल्या, घरातील तरुण पिढी शिकलेली आहे. उच्चशिक्षित आहे . चार चार डिग्री हातात असताना मुलांच्या हाताला रोजगार नाही.याला जबाबदार कोण? पाण्याची टंचाई, विजेचा लपंडाव , रस्त्यावरचे खड्डे या प्रश्नाने आम्ही त्रस्त आहोतच .मात्र आमच्या पुढच्या पिढीसमोर बेरोजगारीचा,चांगल्या शिक्षणाचा खूप मोठा प्रश्न आहे.

> "आज प्रत्येकाला आपले बरे वाईट कळते. शहरात सुरू असलेला भ्रष्टाचार, भोसरी विधानसभेसारख्या मतदार संघाची गेल्या दहा वर्षात झालेली वाताहत, रस्ते, पाणी आणि शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या गोष्टींमध्ये झालेला वारेमाप भ्रष्टाचार यामुळे नागरिकांचे होत असलेले हाल आज प्रत्येक जण ओळखून आहेत. त्यामुळे परिवर्तन अटळ आहे
>
> **–अजित गव्हाणे,**
>
> माजी अध्यक्ष, स्थायी समिती पिंपरी-चिंचवड महापालिका.

#### महिलांनी बेरोजगारीचा मुद्दा आणला ऐरणीवर

पिंपरी चिंचवड शहरातील अनेक उद्योग बाहेर पडत आहे. हिंजवडी भागांमध्ये ट्रॅफिकचा प्रश्न आहे. हेच प्रश्न चाकण तळेगाव एमआयडीसी समोर आ वासून उभे आहेत. महाराष्ट्रात येणारा प्रत्येक औद्योगिक प्रकल्प बाहेर नेला जात आहे. असेच होत राहिले तर आमच्या पुढच्या पिढीसमोर भवितव्य काय आहे असे गंभीर मुद्दे यावेळी महिलांनी मांडले.या प्रश्नांना आम्हीच उत्तर शोधणार आहोत. परिवर्तन घडवून आमच्या आणि आमच्या पुढच्या पिढीच्या भविष्याचा मार्ग सुकर करणार असल्याचा निर्धार यावेळी महिलांनी व्यक्त केला.

---

# शिवार चौक ते गोविंद गार्डन चौक रस्त्याचे होणार आधुनिक पद्धतीने रुंदीकरण

### नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपळे सौदागरमधील शिवार चौक ते गोविंद गार्डन चौक (कुणाल आयकॉन रोड) रस्त्याला आधुनिक पद्धतीने विकसित करण्यासाठी नुकत्याच झालेल्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली. पिंपळे सौदागरमधील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने आणखी एक सकारात्मक पाऊल टाकत ५५ कोटी रुपये मंजूर रकमेसह या प्रकल्पाद्वारे रस्त्यांचे १८ मीटर आणि १२ मीटर रुंदीकरण आणि आधुनिकीकरण करण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.**



कुणाल आयकॉन रस्ता हा वाकड ते नाशिक फाटा रोड आणि जुन्या मुंबई-पुणे आणि मुंबई-बेंगळुरू महामार्गांसह प्रमुख मार्गांना जोडतो, ज्यामुळे हा शहरातील एक महत्वाचा मार्ग आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणास आणि आधुनिकीकरणाच्या अंमलबजावणीला लवकरच सुरूवात होणार असून ३० महिन्यांच्या कालावधीमध्ये प्रकल्प पुर्ण करण्यावर महापालिका भर देणार आहे. पिंपळे सौदागर सारख्या वेगाने वाढणाऱ्या निवासी आणि व्यावसायिक क्षेत्रातील प्रचंड वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी यामुळे मदत होणार आहे.

या प्रकल्पामध्ये इतर आवश्यक सेवांबरोबरच पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी नवीन पावसाळी वहन नलिका, जलनिस्सारण वाहिनी, पाणीपुरवठा वाहिनी, पथदिवे आणि दिशादर्शक सूचनाफलक आदी सुविधांचाही समावेश असणार आहे. तसेच प्रकल्पासाठी अर्बन ट्रान्सपोर्ट फंड (युटीएफ) द्वारे निधी उपलब्ध करून दिला जाणार असून महापालिकेच्या नागरी प्रकल्प विभागाच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे काम केले जाणार आहे. हा महत्वाकांक्षी प्रकल्प वाढत्या शहरीकरणाच्या अनुषंगाने पायाभूत सुविधांच्या आव्हानांना तोंड देत पिंपरी चिंचवडला सुनियोजित, आधुनिक शहरामध्ये रूपांतरित करण्याच्या व्यापक दृष्टिकोनाचा एक भाग आहे.

> "शिवार चौक ते गोविंद गार्डन (कुणाल आयकॉन रोड) रस्त्याच्या विकासामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होईल आणि रहिवाशांना सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाचा अनुभव घेता येईल. या रस्त्याचे अर्बन डिझाईननुसार आधुनिकीकरण करण्यात येणार असल्याने पादचारी, सायकलस्वार तसेच अबालवृद्ध नागरिकांसाठी एक सुरक्षित रस्ता तयार करण्यावर महापालिका भर देणार आहे. नागरिकांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन असे पायाभूत सुविधा प्रकल्प कार्यक्षमतेने पूर्ण करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.
>
> **–– शेखर सिंह,**
>
> आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

#### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

प्रकल्पाची किंमत :- ५५ कोटी रुपये (प्रशासकीय मान्यता)
निविदा रक्कम :- ४२.४३ कोटी रुपये
निविदा स्विकृती रक्कम :- ३३.६७ कोटी रुपये
प्रकल्पाची मुदत :- ३० महिने
निधी स्त्रोत:- अर्बन ट्रान्सपोर्ट फंड (युटीएफ)

# विषमतेचा इतिहास पुसण्याची संधी



## भूमिका

**ब्रिटिशांशी संघर्षानंतर १७८३ मध्ये अमेरिकेला देश म्हणून मान्यता मिळाली. या स्वातंत्र्ययुद्धाचे सेनानी जॉर्ज वाशिंग्टन आणि त्यांना साथ देणारे थॉमस जेफरसन यांनी या देशाची घडी बसवण्यासाठी शर्थ करून, ४ मार्च १७९० रोजी सर्व वसाहतींना राज्यांचा स्वायत्त दर्जा देणारे संविधान निर्माण केले आणि ३० एप्रिल १७९० मध्ये अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून जॉर्ज वाशिंग्टन यांची निवड करण्यात आली.**

तेव्हापासून आजतागायत, अमेरिकी राष्ट्राध्यक्ष दर चार वर्षांकरिता निवडण्याची प्रथा कायम आहे. मात्र या सर्व २३० वर्षांत अमेरिकेचे अध्यक्षपद एकदाही महिलेला मिळालेले नाही, ते मिळण्याची शक्यता यंदा निर्माण झाली आहे.अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीने काही चांगले पायंडेही जरूर पाडले आहेत. उदाहरणार्थ, एका व्यक्तीला एक किंवा दोन कार्यकाळांसाठीच- म्हणजे चार वा आठ वर्षेच अध्यक्षपदी राहाता यावे, ही पद्धत अमेरिकेतच प्रथम रुळली. याला अपवाद म्हणजे फ्रँकलिन रूझवेल्ट यांचा १२ वर्षांचा कार्यकाळ; पण १९३३ पासून ते पदावर असेपर्यंत दुसरे महायुद्धच सुरू होते. या दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेला महासत्ता म्हणून जगन्मान्यता मिळाली खरी, पण महासत्तेला सत्ताधारी महिलांचे वावडेच असल्याचे दिसले.वास्तविक



याच दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात कितीतरी विकसनशील देशांतदेखील महिला सरकारप्रमुख लोकशाही मार्गाने निवडून आल्या. श्रीलंका हा तसा छोटा देश, तेथे १९६० मध्ये सिरिमावो भंडारनायके अध्यक्ष झाल्या. भारतात इंदिरा गांधी, बांगलादेशात खालिदा झिया एकदा, तर शेख हसीना पाच वेळा पंतप्रधान झाल्या. मागरिट थॅचर दहा वर्षांसाठी ब्रिटनच्या प्राइम मिनिस्टर झाल्या आणि त्यांनी 'थॅचरिझम'चा ठसा उमटवला (नंतरच्या काळात ब्रिटनचे हेच पद लिझ ट्रस यांनाही काही काळ मिळाले). पाकिस्तान हा कट्टरपंथी मुस्लिम देश, तरीही बेनझीर बुत्तो तिथल्या वझीर ए आजम झाल्या. कॅनडाच्या किम क्रामबेल, तुर्कीच्या तंसू किलर, न्युझीलंडच्या जेनिफर शिप्ले या पहिल्या महिला पंतप्रधान, पण जेसिंडा आर्डर्न यांनी या पदावर आपल्या साधेपणाची मोहोर उमटवली. ऑस्ट्रेलियात ज्युलिया गिलार्ड यांना पंतप्रधान मिळाले. जर्मनीच्या अंन्जेला मार्केल दोन वेळा चान्सलर म्हणून निवडून आल्या. फिलिपाईन्स, नॉर्वे, लायबेरिया, डेन्मार्क, आईसलंड अशा अनेक देशांतील जनतेने त्यांच्या महिला नेत्यांना सरकारप्रमुख पदावर निवडून दिले. महिला पुरुषांपेक्षा कमी आहेत असे कुठेही दिसले नाही. त्यांनी स्वतःला सक्षम प्रमुख म्हणून सिद्ध केले आहे. असे असतानाही जगात केवळ अमेरिका, रशिया, चीन व इतर अशा काही प्रमुख राष्ट्रांनी महिलांना कधीही प्रमुख म्हणून निवडून दिले नाही. खरेतर अमेरिका हे सुधारित पुरोगामी राष्ट्र, त्यामुळे राष्ट्राध्यक्षपदातही स्त्रीपुरुष समानता तिथे आधीच दिसू शकली असती- पण तसे आजवर तरी झालेले नाही.हिलरी क्लिंटन या अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या पत्नी त्या अत्यंत बुद्धिमान, कुशल नेत्या, मुत्सद्दी, राष्ट्रप्रेमी. त्यांना १९९३-२००१ पर्यंत 'फर्स्ट लेडी' म्हणून मान मिळाला. २००८ मध्ये त्यांनी ओबामांविरुद्ध निवडणुकीत अध्यक्षपदासाठी प्रयत्न केला पक्षांतर्गत फेऱ्यांमध्ये पराभूत ठरलेल्या हिलरी यांना ओबामांनी उपाध्यक्षपदाच्या उमेदवार म्हणून निवडले. पुन्हा २०१६ मध्ये हिलरींना राष्ट्राध्यक्षपदाची उमेदवारी त्यांच्या पक्षाने दिली... पण लोकांनी त्यांचा निवडणुकीत पराभव केला व ट्रम्प यांना अध्यक्ष म्हणून निवडून दिले. हिलरी क्लिंटन जर अमेरिकेच्या अध्यक्ष झाल्या असत्या तर अमेरिकेतील पुरुष महिला समानतेचे तत्त्व सिद्ध होऊन जगासमोर आदर्श ठेवता आला असता, परंतु ही घटना अमेरिकेत घडली नाही. असे होण्यास काही ऐतिहासिक कारणे आहेत.अमेरिकेत काळ्या गुलामांची जवळ-जवळ २५० वर्षे खुल्या बाजारात प्राण्यांप्रमाणे विक्री झाली. त्यांनी कोणताही अधिकार माणूस म्हणून नव्हता. अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष अब्राहम लिंकन निवडून आले. १८६३ मध्ये त्यांनी काळ्या लोकांची गुलामी संपविली. काळ्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. सोबतच काळा गोरा वर्णभेद, रंगभेद विसरून जेव्हा दोन तृतीयांश म्हणजे ६८% गोरे असतांना कृष्णवर्णीयांचा मोठा सन्मानच होता.

## प्रासंगिक »

# काय साजरे केले?

***ढोलताशे, डीजे, लेझर हे एकदोन दिवसांपुरते असेल, तर एक वेळ समजण्यासारखे. पण कोणताही आनंद व्यक्त करण्यासाठी हल्ली या 'आयुधां'चा वापर केला जातो...***

'तुम्हाला नेहमी 'आपले'च दोष का दिसतात? 'त्यांचे' का दिसत नाहीत...? त्यांच्यावरही जरा टीका करून बघा की... म्हणजे समजेल काय होते ते..." हा प्रतिवाद होण्याचा धोका आहेच; पण 'आपल्या'त काय सुरू असते, ते 'आपल्या'ला आतून नीट माहीत असते, त्यामुळे आपण 'आपली' चर्चा करावी, 'त्यांचे' 'ते' बघून घेतील, हे त्याचे उत्तरही तयार असायला हवे. संदर्भ आहे, अर्थातच नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवाचा. आणि ईदचाही. गोकुळाष्टमीच्या दिवशी कृष्णाच्या नावाखाली घातल्या जाणाऱ्या आवाजी धुडगुसाचा आणि त्याचबरोबर लग्नाच्या वरातींपासून तथाकथित कार्यसम्राटांच्या कर्तृत्वाचे कवतुक करण्यासाठी केल्या जाणाऱ्या दणदणाटाचाही. नुकत्याच झालेल्या गणेशउत्सव आणि इद ए मिलाद या उत्सवांदरम्यान दोन्ही बाजूच्या लोकांनी ठिकठिकाणी मनसोक्त कानठळी ध्वनीनिर्मिती केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येत्या शनिवारी- २१ सप्टेंबर रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्याशी चर्चा करणार आहेत. न्यूयॉर्कपासून दोन तासांच्या अंतरावरील विल्मिंग्टन येथे होणाऱ्या या भेटीत, गेल्या चार वर्षांतील वाढत्या भारत-अमेरिका भागीदारीबद्दल यथार्थ अभिमान व्यक्त केला जाईलच.

# बायडेन यांनी ट्रम्प यांचे भारत-धोरण राखले

पण उच्च तंत्रज्ञान, संरक्षण आणि क्षेत्रीय सुरक्षा या विषयांवरील भारत-अमेरिकेच्या धोरणात्मक सहकार्यासाठी जाहीर केलेल्या काही मोठ्या कल्पनांचे ठोस परिणामांमध्ये रूपांतर झाल्याचे या चर्चेअंती दिसल्यास नवल नाही.हे विल्मिंग्टन म्हणजे, अमेरिकेच्या डेलावेअर राज्यातले बायडेन यांचे मूळ गाव. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत व जपान या देशांच्या 'क्वाड' सुरक्षा-सहकार्य गटाची शिखर बैठक तेथे होणार आहे, तेव्हाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष द्विपक्षीय बैठकांवरही भर देतील. राष्ट्राध्यक्ष बायडेन आणि त्यांच्या सल्लागारांनी 'क्वाड'ला आशियातील विश्वासार्ह नवीन मंच बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात राजकीय आणि प्रशासकीय गुंतवणूक केल्याचे गेल्या साडेतीन वर्षांत दिसले आहे. बायडेन यांनी 'क्वाड'मधील तीन्ही देशांशी अमेरिकेचे द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावरही नि:संशय अधिक भर दिलेला आहे. या नियोजित भेटीनिमित्ताने, भारत-



अमेरिका संबंधांमध्ये बायडेन यांच्या योगदानावर इथे ऊहापोह करू. बायडेन यांचे अनेक निर्णय भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि सुरक्षेचा तांत्रिक-औद्योगिक पाया अधिक सखोल करण्याच्या दिल्लीच्या योजनांना पाठिंबा देणारे ठरलेले आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये जेव्हा बायडेन यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय मिळवला, तेव्हा ट्रम्प प्रशासनाने संबंधांना दिलेली राजकीय गती टिकवून ठेवण्याची क्षमता किंवा इच्छा बायडेन यांच्याकडे कितपत असेल, असा संशय भारतातील (प्रस्तुत लेखकासह) अनेक विश्लेषकांनी व्यक्त केला होता. डेमोक्रॅटिक पक्षाच्या भारतविषयक परराष्ट्र धोरणातील सद्भावनेबद्दलचा हा संशय नव्हता. बिल क्लिंटन यांनी सन २००० मध्ये भारताला भेट दिली, त्याआधीच्या २२ वर्षांत अमेरिकेचे अध्यक्ष कधी भारताकडे फिरकले नव्हते, पण २००० पासून वॉशिंग्टनमधील दोन्ही राजकीय पक्षांमध्ये भारताशी भागीदारीबाबत पक्षातीत असे एकमत दिसून आलेले आहे. मग, तरीदेखील २०२० च्या नोव्हेंबर-डिसेंबरात भारतीय विश्लेषकांना संशय का होता?याचे कमी शब्दांतील उत्तर म्हणजे 'ट्रम्प यांच्या तीन धोरण-पालटांना बायडेन प्रशासन कसे प्रतिसाद देणार, यावर शंका होती'. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील सर्वच धोरण-पालटांची चर्चा करण्याची ही जागा नव्हे; पण ट्रम्प यांच्या तीन नवकल्पनांमधून भारताला अधिक उभारी निश्चितपणे मिळणार होती – (१)अफगाणिस्तानात सतत लष्करी उपस्थितीची निरर्थकता ओळखणे, (२) पाकिस्तानशी संबंध कमी करणे आणि (३) आशियातील चिनी ठामपणाचा सामना करणे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- **संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बिल्डरसारख्या औलादींना हेच हवं असतं!

## राज ठाकरेंनी टाऊन प्लानिंगचं सांगितलं महत्त्व!

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वरळी विधानसभा मतदारसंघात म्हणजे आदित्य ठाकरे यांच्या मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी झंझावाती भाषण केलं. टाऊन प्लानिंगपासून पुतळ्याच्या राजकरणापर्यंत राज ठाकरेंनी सडेतोड भाषण केलं. तसंच, राजकारण्यांसह बिल्डरलॉबीपासूनही सावध व्हा असं आवाहन राज ठाकरेंनी केलं. वरळीत आज मनसेकडून वरळी व्हिजन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं, तिथे ते बोलत होते.**



मला ही बीडीडी चाळ समोर दिसली की मला माझं बालपण आठवतं. वडिलांबरोबर मी येथे येत असे. कोणत्या इमारतीत राहायचे हे आठवत नाही, पण आमचे डॉक्टर या बीडीडी चाळीत राहायचे", अशी आठवण राज ठाकरेंनी आज सांगितली.ते पुढे म्हणाले, "गेले अनेक महिने बीडीडी चाळीतले लोक येतात, पोलीस बांधव, पोलीस भगिनी येतात, कोळीवाड्यातील बांधव भगिनी येतात. आज काही जाहीर सभा नाही, यामुळे लांबट भाषण करणार नाही. तुम्ही या महाराष्ट्राचे मालक आहात, तुम्ही या मुंबईचे मालक असून का रडताय? बाहेरच्या राज्यातून लोक येतात, झोपडपट्ट्या वसवतात आणि फुटकात सर्व घेऊन जातात. याचं कारण योग्य वेळी योग्य ताकद दाखवत नाही. ऐरवी पाच वर्षे भांड भांड भांडणार आणि ऐन मोक्याच्या वेळी घरंगळत जाणार. आणि त्यांनाही माहितेय की तुम्ही जाऊन जाऊन जाणार कुठे? त्यामुळे तुमचे प्रकल्प रखडत राहणार आणि जे बाहेरून येतात ज्यावेळी त्यांची टगेगिरी सुरू होते, त्यांच्या म्हणण्यांनुसार गोष्टी त्यांना मिळतात, हातात येतात त्यांच्या", असं राज ठाकरे म्हणाले."वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये वीस बावीस वर्षांपूर्वी तिकडच्या झोपडपट्टी धारकांना ऑफर होती, एकतर घर मिळेल किंवा एक कोटी रुपये मिळतील. वीस वर्षांपूर्वी एक कोटी रुपये. आणि आमच्याकडे काय चाललंय, आम्हाला एवढं स्क्वेअर फूट वाढवून द्या", अशी टीकाही त्यांनी केली. "तुम्हाला स्वाभिमानाने उभं राहायचं असेल, तर स्वाभिमानी मणका तंदुरुस्त करून घ्या. म्हणजे जे येतात आणि जातात ते होणार नाही. डेव्हलोपमेंट प्लान होतोय, पण टाऊन प्लानिंग होत नाही", असंही ते म्हणाले."तुमची स्वतःची हक्काची जमीन विकासकाला देत असताना तुम्ही प्रश्न विचारत नाहीत, आणि हेच त्या लोकांना हवं असतं. बिल्डरसारख्या अवलादींना हेच हवं असतं. त्यावर राजकारणी बसलेलेच आहेत बसलेले. तुम्ही स्वतः एकत्र राहणं गरजेचं आहे", असा सल्लाही त्यांनी दिला. "राज्य आणि राष्ट्र उभं करायंच असतं तेव्हा २००-३०० वर्षांचा विचार करायचा असतो. प्रत्येक शहरांचं कॅरेक्टर असतं, लंडनला गेलात तर तिथली एक टॅक्सी असते. पण आपल्या एकाही शहराला कॅरेक्टर उरलं नाही. या शहराची ओळख नाही. फ्लायओव्हर्स ही आपली ओळख. पण हे कशासाठी होतंय?" असा प्रश्नही त्यांनी विचारला."मुंबईची लोकसंख्या किती, त्यातून बाहेरून येणाऱ्यांची संख्या किती, मग रस्ते केले पाहिजे, इमारती, फ्लायओव्हर्स वाढले पाहिजेत. वाढत जाणाऱ्या लोकसंख्येत इथल्या लोकांचा हात नाहीय, बाहेरून येणाऱ्या लोकांमुळे लोकसंख्या वाढतेय. मग त्यांना सुविधा देण्यात आमचा खर्च करतोय, मग आमचा पैसा इथे खर्च होऊन आमचा शेतकरी आत्महत्या करतोय. जिथे पैसा खर्च व्हायला पाहिजे तिथे होत नाही.ठाणे जिल्ह्यात एका जगाच्या पाठीवर असा जिल्हा मिळणार नाही, या देशात तर नाहीच नाही, लोकसंख्या वाढत जाते तशी ग्रामपंचायत, नगरपालिका वगैरे होत जाते. मुंबईत एक महानगर पालिका, पुण्यात दोन आहेत. ठाणे हा एकमेव जिल्हा आहे, ज्या जिल्ह्यात आठ महानगरपालिका आहेत. ठाणे जिल्ह्यातील लोकांनी लोकसंख्या वाढवली नाही, जनगणना पाहिली तर बाहेरील राज्यातील सर्वाधिक लोकसंख्या ठाण्यात आहे. मग कुठून आणणार आहात सुविधा?

इथला माणूस सुखी झाला तर बाहेरून माणूस आला तर आम्ही सांभाळून घेऊ", असंही राज ठाकरे म्हणाले.मला ही बीडीडी चाळ समोर दिसली की मला माझं बालपण आठवतं. वडिलांबरोबर मी येथे येत असे. आज काही जाहीर सभा नाही, यामुळे लांबट भाषण करणार नाही. तुम्ही या महाराष्ट्राचे मालक आहात, तुम्ही या मुंबईचे मालक असून का रडताय?

### एकतर घर मिळेल किंवा एक कोटी

तुमचे प्रकल्प रखडत राहणार आणि जे बाहेरून येतात ज्यावेळी त्यांची टगेगिरी सुरू होते, त्यांच्या म्हणण्यांनुसार गोष्टी त्यांना मिळतात, हातात येतात त्यांच्या", असं राज ठाकरे म्हणाले."वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये वीस बावीस वर्षांपूर्वी तिकडच्या झोपडपट्टी धारकांना ऑफर होती, एकतर घर मिळेल किंवा एक कोटी रुपये मिळतील. वीस वर्षांपूर्वी एक कोटी रुपये. आणि आमच्याकडे काय चाललंय, आम्हाला एवढं स्क्वेअर फूट वाढवून द्या", अशी टीकाही त्यांनी केली."तुम्हाला स्वाभिमानाने उभं राहायचं असेल, तर स्वाभिमानी मणका तंदुरुस्त करून घ्या.

# विधानसभा निवडणुकीची घोषणा लवकरच होणार

## देवेंद्र फडणवीस नाना पाटेकरांची गळाभेट, देवेंद्र फडणवीस बारीक झालेत

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अभिनेते नाना पाटेकरहे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी आणि तेवढ्याच दिलखुलासपणासाठी ओळखले जातात. त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे नाना पाटेकर यांना अनेक जण उद्धट किंवा रागीटही म्हणतात. मात्र कुठलीही पर्वा न करता नाना पाटेकरत्यांची मतं मांडत असतात. नाम फाऊंडेशनच्या कार्यक्रमात नाना पाटेकर बोलत होते त्यावेळी देवेंद्र फडणवीस आले.**





देवेंद्र फडणवीस आणि नाना पाटेकर यांची स्टेजवर गळाभेट झाली. त्यानंतर नाना पाटेकर यांनी एक वक्तव्य केलं आणि उपस्थितांना हशा पिकला. देवेंद्र फडणवीसही दिलखुलासपणे हसले."आमची आता केंद्र सरकारकडे मागणी आहे की त्यांनी तातडीने स्वामिनाथन आयोग लागू करावा. एकनाथ शिंदे आज त्यांची प्रकृती ठिक नसल्याने आले नाहीत. तसंच अजित पवार यांनीही येण्याबाबत शब्द दिला आहे. मात्र त्यांचे अनेक कार्यक्रम ठरले आहेत. देवेंद्र फडणवीस येत आहेत. याचा आनंद आहे, हा नामचा कार्यक्रम आहे तो काही राजकीय कार्यक्रम नाही. आपण जे केलं ते सांगायचं कशाला? आपण करायचं आणि विसरुन जायचं. आता आमची एकच फक्त छोटी मागणी आहे की स्वामिनाथन आयोग लागू करा. तो लागू केला आणि शेतकऱ्यांना रास्त भाव मिळाला तर सन्मानच होईल. अंशतः आयोग लागू केला आणि पण तो पूर्णपणे लागू करा एवढीच माझी विनंती आहे." असं नाना पाटेकर म्हणाले. नाना पाटेकर बोलत असताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नामच्या कार्यक्रमात आले. त्यावेळी लगेच नाना पाटेकर यांची गळाभेट देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आणि म्हणाले, "देवेंद्र फडणवीस जरा बारीक झाले आहेत ना? नाही मी मस्करी करत नाही. खरंच सांगतो आहे. देवेंद्र फडणवीस तुम्ही चांगलेच बारीक झाला आहात." नाना पाटेकरयांनी हे वाक्य उच्चारताच देवेंद्र फडणवीस दिलखुलासपणे हसले.

### आपली 12 मिनिटांची क्लिप आहे

त्यानंतर उपस्थितांमध्येही चांगलाच हशा पिकला.त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत नाना म्हणाले, "मी देवेंद्र फडणवीस साहेब यांना विनंती करतो की तुम्ही बोला. पण तुम्हाला सांगू का? मला फडणवीस साहेब असं बोलताच येत नाही. मी देवेंद्र असंच म्हणतो. आपली १२ मिनिटांची क्लिप आहे ती पाहू त्यानंतर देवेंद्र फडणवीस बोलतील. साधारणपणे ते जेवल्याशिवाय जात नाहीत. जेवण केलं की मग नंतर ते जातील" असं नाना पाटेकर म्हणाले.नाम फाऊंडेशनच्या ९ वा वर्धापन सोहळा जागर नामचा या कार्यक्रमात ही गंमत घडली.

# मुख्यमंत्रिपदी आतिशी विराजमान!

## सर्वात तरुण मुख्यमंत्री म्हणून आतिशी यांच्या नावाची नोंद

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आतिशी मार्लेना यांनी आज दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. आम आदमी पक्षाचे प्रमुख नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी १७ सप्टेंबरला त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आतिशी यांची एकमताने निवड मुख्यमंत्री म्हणून करण्यात आली. २१ सप्टेंबर शनिवार या दिवशी आतिशी यांना उपराज्यपालांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ दिली. आतिशी या आपच्या आमदार आहेत. अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदिया यांच्या निकटवर्तीय मानल्या जातात.**



दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून आतिशी यांनी शपथ घेतली. त्यांच्यासह पाच आमदारांनाही मंत्रिपदाची शपथ देण्यात आली. उपराज्यपालांच्या निवासस्थानी हा सोहळा पार पडला. आतिशी या दिल्लीच्या सर्वात तरुण मुख्यमंत्री ठरल्या आहेत. त्यांच्या शपथविधी सोहळ्याला अरविंद केजरीवाल यांच्यासह इतर प्रमुख नेते उपस्थित होते. १५ सप्टेंबर रोजी अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार हे जाहीर केलं होतं. त्यानंतर आम आदमी पक्षाच्या मुख्यमंत्रिपदी कोण विराजमान होणार याची चर्चा रंगली होती. पुढच्या दोन दिवसातच आतिशी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. आता आतिशी यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे.आतिशी ( ATISHI ) यांचा जन्म दिल्लीतील एका उच्चशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचं कॉलेजपर्यंतचे शिक्षण दिल्लीतूनच झालं आहे पुढे त्या उच्च शिक्षणासाठी ऑक्सफर्ड विद्यापीठात गेल्या. २०१२ मध्ये आम आदमी पक्षाची स्थापन झाली, आतिशी या २०१९ मध्ये सक्रिय राजकारणात आल्या. त्यावेळी पक्षाने आतिशी यांना पूर्व दिल्लीतून भाजपचे उमेदवार गौतम गंभीर यांच्या विरोधात उमेदवारी दिली होती. यात आतिशी यांचा या निवडणुकीत चार लाखांहून अधिक मतांनी पराभव झाला, त्या तिसऱ्या क्रमांकावर होत्या. मात्र, पुढच्या वर्षी कालकाजी विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाने त्यांना उमेदवारी दिली आणि त्या विजयी झाल्या. तीन वर्षांनंतर मनीष सिसोदिया यांच्या राजीनाम्यानंतर त्या दिल्ली सरकारमध्ये मंत्री झाल्या. २०१९ ते २०२४ अवघ्या पाच वर्षात त्यांनी मुख्यमंत्रिपदापर्यंत मजल मारली आहे ही बाब महत्त्वाची आहे. आतिशी या दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री आहेत. त्याआधी भाजपाच्या सुषमा स्वराज आणि काँग्रेसच्या शीला दीक्षित यांनी दिल्लीचं मुख्यमंत्रिपद सांभाळलं आहे. १९९८ मध्ये सुषमा स्वराज या ५२ दिवसांसाठी मुख्यमंत्री झाल्या होत्या. तर १९९८ मध्ये शीला दीक्षित या १५ वर्षे २५ दिवसांसाठी मुख्यमंत्री होत्या. दीर्घ काळ मुख्यमंत्री राहण्याचा रेकॉर्ड हा शीला दीक्षित यांच्या नावे आहेत. यानंतर आता आपच्या नेत्या आतिशी दिल्लीच्या मुख्यमंत्री झाल्या आहेत.आतिशी मार्लेना यांनी आज दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. आम आदमी पक्षाचे प्रमुख नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी १७ सप्टेंबरला त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आतिशी यांची एकमताने निवड मुख्यमंत्री म्हणून करण्यात आली. २१ सप्टेंबर शनिवार या दिवशी आतिशी यांना उपराज्यपालांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ दिली. आतिशी या आपच्या आमदार आहेत. अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदिया यांच्या निकटवर्तीय मानल्या जातात २०१९ ते २०२४ अवघ्या पाच वर्षात त्यांनी मुख्यमंत्रिपदापर्यंत मजल मारली आहे ही बाब महत्त्वाची आहे सुषमा स्वराज आणि काँग्रेसच्या शीला दीक्षित यांनी दिल्लीचं मुख्यमंत्रिपद सांभाळलं आहे. १९९८ मध्ये सुषमा स्वराज या ५२ दिवसांसाठी मुख्यमंत्री झाल्या होत्या.

### आतिशी यांची एकमताने निवड

दीर्घ काळ मुख्यमंत्री राहण्याचा रेकॉर्ड हा शीला दीक्षित यांच्या नावे आहेत. यानंतर आता आपच्या नेत्या आतिशी दिल्लीच्या मुख्यमंत्री झाल्या आहेत. आतिशी मार्लेना यांनी आज दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. आम आदमी पक्षाचे प्रमुख नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी १७ सप्टेंबरला त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला.

त्यानंतर आतिशी यांची एकमताने निवड मुख्यमंत्री म्हणून करण्यात आली. २१ सप्टेंबर शनिवार या दिवशी आतिशी यांना उपराज्यपालांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ दिली. आतिशी या आपच्या आमदार आहेत. अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदिया यांच्या निकटवर्तीय मानल्या जातात.

# 'तुझ्या दिल्लीतील मित्रांमुळे धार्मिक तणाव'

## अभिनेते प्रकाश राज यांची पवन कल्याण यांच्यावर टीका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आंध्रप्रदेशच्या तिरुमला तिरुपती मंदिरात प्राण्यांची चरबी असलेले लाडू प्रसादात दिले गेल्याचा वाद निर्माण झाल्यानंतर हा विषय राष्ट्रीय पातळीवर गाजत आहे. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी याप्रकरणाची वाच्यता केल्यानंतर प्रसादाची तपासणी प्रयोगशाळेत करण्यात आली.**



त्यामध्ये प्रसादात प्राण्यांची चरबी, बीफ टॅलो वापरले गेल्याचे समोर आले. तसेच उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी यानंतर राष्ट्रीय पातळीवर 'सनातन धर्म संरक्षण मंडळ' स्थापन करण्याची मागणी केली. या मागणीनंतर दाक्षिणात्य आणि बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेते प्रकाश राज यांनी सडेतोड मत मांडले आहे. उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी दोषींची चौकशी करून कडक कारवाई करावी, पण या विषयाला राष्ट्रीय पातळीवर नेण्याची काय गरज आहे? असा प्रश्न त्यांनी विचारला. उपमुख्यमंत्री पवन कल्याण म्हणाले की, गेल्या सरकारच्या कार्यकाळात तिरुपती बालाजी प्रसादमध्ये प्राण्यांची चरबी ) मिसळल्याच्या निष्कर्षांमुळे आम्ही सर्वजण खूप व्यथित झालो आहोत.

संपूर्ण भारतातील मंदिरांशी संबंधित सर्व समस्यांवर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर 'सनातन धर्म संरक्षण मंडळ' स्थापन करण्याची वेळ आली आहे.

### देशात कमी धार्मिक तणाव आहे का...

माझा विश्वास आहे की, 'सनातन धर्माचा' कोणत्याही स्वरूपात होणारा अपमान थांबवण्यासाठी आपण सर्वांनी त्वरित एकत्र आले पाहिजे.पवन कल्याण यांच्या या आवाहनानंतर प्रकाश राज यांनी एक्सवर पोस्ट करून टीका केली आहे. ते म्हणाले, "प्रिय मित्रा, तू ज्या राज्याचा उपमुख्यमंत्री आहेस, त्या राज्यात ही घटना घडली आहे. कृपया तू चौकशी लाव. या घटनेमागे दोषी कोण आहेत, ते शोधून त्यांना कडक शासन कर. पण हा विषय राष्ट्रीय पातळीवर तापवण्यात काय अर्थ आहे. आधीच देशात कमी धार्मिक तणाव आहे का... (याबद्दल तुझ्या दिल्लीतील मित्रांचे आभार)"


# लग्न केल्यावर शिबानी झाली ट्रोल

मराठमोळी शिबानी दांडेकर आणि फरहान अख्तर कामाच्या निमित्ताने एकमेकांना भेटले होते. नंतर ते एकमेकांच्या प्रेमात पडले आणि त्यांनी लग्न केलं. शिबानी मराठी कुटुंबातील आहे, तर फरहान मुस्लीम आहे. दोघांनी २०२२ मध्ये आंतरधर्मीय लग्न केलं. फरहानशी लग्न केल्यावर ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं, असा खुलासा शिबानीने केला आहे. रिया चक्रवर्तीला दिलेल्या मुलाखतीत ट्रोलिंगचा सामना कसा करते याबाबत शिबानीने सांगितलं. “सोशल मीडियावरील कमेंट्समध्ये काही तथ्य असेल तरचं तुम्ही त्यावर विश्वास ठेवायला पाहिजे, असं मला वाटतं. लोक खोटं, तथ्यहीन बोलत असतील तर त्याचा तुमच्यावर परिणाम व्हायला नको,” असं शिबानी म्हणाली.



स्वतःचे अनुभव सांगत शिबानी म्हणाली, “मी फरहानबरोबर रिलेशनशिपमध्ये आले, तेव्हा लोक मला ‘लव्ह जिहाद आणि गोल्ड डिगर’ या दोनच गोष्टी बोलायचे. पण फक्त लोक बोलतायत म्हणून ते ऐकून रडणारी मी नाही. मी गोल्ड डिगर नाही. तो मुस्लीम आहे हे सत्य आहे आणि मी हिंदू आहे. आम्ही लग्न केलं आणि दोघेही आनंदी आहोत, हे वास्तव आहे. त्यामुळे लोकांना जे वाटतं ते त्यांनी बोलावं.” “लोक माझ्याबद्दल ‘ही कोण आहे?’, ‘फरहान अख्तरशी लग्न करण्यापूर्वी ती कोण होती?’ अशा कमेंट्स करतात. मी त्या वाचते आणि विचार करते, ‘मी माझ्या आयुष्यात काही केलंय का?’ मी त्याच्याशी लग्न करण्याआधी कोण होते? किंवा त्याला भेटण्यापूर्वी ३९ वर्षे मी जगले आहे हे मला माहीत आहे का? मी कोणत्याही अनोळखी व्यक्तीने केलेल्या कमेंटवर विश्वास ठेवायचा की स्वतःच्या प्रवासावर विश्वास ठेवायचा?

# चित्रपटाची कमाई हेच यशाचे माप



चित्रपटाचा दर्जा कलेक्शनवरून मोजता कामा नये. यामी म्हणाली की, आजकाल सामान्य लोकही व्यापाराची भाषा बोलू लागले आहेत. चित्रपट चांगला आहे की नाही हे त्याच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनवरून ठरवले जाते. मी माझ्या नवीन चित्रपटासाठी प्रशिक्षण घेत होते. मग माझा केअरटेकर माझ्याकडे आला. तो म्हणाला मॅडम, तुमचा चित्रपट खूप चांगला आहे, पण कमाई दुसऱ्या चित्रपटाची झाली आहे. मी आश्चर्यचकित झालो. हे सर्व उद्योग करणारे लोक करतात, पण आता सामान्य जनताही व्यापाराची भाषा बोलू लागली आहे. हा चित्रपट किती चांगला आहे यावर नाही, तर चित्रपटाने किती कमाई केली, याचीच चर्चा आहे. ते खूप धोकादायक आहे. कलेक्शन हेच चित्रपटाच्या गुणवत्तेचे मोजमाप बनू नये ही भीती. माझे कुटुंब माझे सर्वात मोठे टीकाकार आहे. तिथून स्तुती होत असेल तर काय हरकत आहे. मला आठवते 'लॉस्ट' चित्रपटाच्या वेळी माझे वडील म्हणाले होते - यामी, तू इतकी चांगली अभिनेत्री कधी झालीस? ज्या तीव्रतेने ते म्हणाले. प्रेक्षक चित्रपटातील कोर्टरूम ड्रामाचा आनंद घेत होते. पती आदित्य धरने हा चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच पाहिला होता.चित्रपटाचा दर्जा कलेक्शनवरून मोजता कामा नये. यामी म्हणाली की, आजकाल सामान्य लोकही व्यापाराची भाषा बोलू लागले आहेत. चित्रपट चांगला आहे की नाही हे त्याच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनवरून ठरवले जाते. मी माझ्या नवीन चित्रपटासाठी प्रशिक्षण घेत होते.

# जरीन कामावर परतली



काही दिवसांपूर्वी अभिनेत्री जरीन खानला डेंग्यू झाला होता. यामुळे तिला रुग्णालयात दाखल करावे लागले होते. आता ती बरी असून अलीकडेच ती मुंबईत स्पॉट झाली होती. ज्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये जरीन पांढरा शर्ट आणि निळ्या डेनिम जीन्समध्ये दिसली. पापाराझींशी बोलताना तिने आपल्या आरोग्याची माहितीही दिली. एका पापाराझीने अभिनेत्रीला विचारले की इतके दिवस ती कुठे होती? तर झरीनने सांगितले की ती गेल्या आठवड्यात हॉस्पिटलमध्ये होती. पुढे म्हणाली– मला आता थोडं बरं वाटतंय, म्हणून वाटलं कामावर परत जाऊया. यापूर्वी जरीन खानने इंस्टाग्राम हँडलवर काही फोटो शेअर करून डेंग्यूची माहिती दिली होती. हातात ड्रिप असलेला फोटो शेअर करत जरीनने लिहिले- 'लाइफ अपडेट.' मात्र, काही वेळाने अभिनेत्रीने ती पोस्ट डिलीट केली होती. नंतर जरीनने ज्यूसच्या ग्लासचा आणखी एक फोटो शेअर केला. या पोस्टद्वारे जरीनने तिच्या चाहत्यांना आणि फॉलोअर्सना डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी आणि खबरदारी घेण्याच्या सूचना केल्या होत्या. जरीनने 2010 मध्ये 'वीर' या चित्रपटातून आपल्या फिल्मी करिअरला सुरुवात केली. त्यानंतर लोकांनी तिची कतरिना कैफसोबत तुलना करायला सुरुवात केली. सलमानच्या रेडी चित्रपटातील कैरेक्टर ढीला ही तिची आयटम नंबर कॅरेक्टर खूप लोकप्रिय झाली होती. जरीनने अक्षय कुमारच्या हाऊसफुल 2 या चित्रपटातही काम केले आहे. याशिवाय 2, हेट स्टोरी-3, वजा तुम हो आणि हम भी अकेले, तुम भी अकेले या चित्रपटांमध्ये दिसली होती.



# परिणीती चोप्राने गायले पंजाबी गाणे

सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्याला पाहून चाहते तिचे खूप कौतुक करत आहेत. व्हिडिओमध्ये आलिया मुंबईतील एका रेस्टॉरंटबाहेर दिसत आहे. ती आईसोबत बाहेर जात होती. छायाचित्रकार त्यांचे फोटो काढण्यासाठी धावत असताना त्यातील एकाची चप्पल पायातून निघाली. आलियाने चप्पल पाहिल्यावर विचारले ती कोणाची आहे? तेथे उपस्थित असलेल्या एका छायाचित्रकाराने त्यांच्यापैकी एकाचे असल्याचे उत्तर दिले. हे ऐकून आलियाने तिच्या हाताने चप्पल उचलली आणि फोटोग्राफरला दिली. या व्हिडिओवरील कमेंट सेक्शनमध्ये चाहते आलियाच्या या कृतीचे कौतुक करत आहेत. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'ये है असली क्वीन'. दुसऱ्या यूजरने त्याचे वर्णन डाउन टू अर्थ असे केले गेले आहे. तर तिसऱ्याने लिहिले, 'ती खूप गोड आणि विनम्र आहे, आलिया माझी आवडती अभिनेत्री आहे'. आलिया भट्ट गॅल गॅडोट आणि जेमी डोर्नन यांच्यासोबत 'हार्ट ऑफ स्टोन'मधून हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. नेटफ्लिक्सने या स्पाय-ॲक्शन चित्रपटाचा ट्रेलर लाँच केला आहे. या चित्रपटाद्वारे आलिया भट्टने हॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे. 'हार्ट ऑफ स्टोन' या चित्रपटात गॅल गॅडोट आणि जेमी डोर्नन मुख्य भूमिकेत आहेत. तर आलिया भट्ट खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे.सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्याला पाहून चाहते तिचे खूप कौतुक करत आहेत.छायाचित्रकार त्यांचे फोटो काढण्यासाठी धावत असताना त्यातील एकाची चप्पल पायातून निघाली. आलियाने चप्पल पाहिल्यावर विचारले ती कोणाची आहे?

# बॅटची पूजा करुन पंत मैदानात उतरला

## पंतने लंचब्रेकनंतर दुसऱ्या डावात शतक झळकावले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत-बांगलादेशमधील चेन्नई कसोटीत ६३३ दिवसांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणाऱ्या ऋषभ पंतने शानदार शतक झळकावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. या शतकासह ऋषभ पंतने इतिहास घडवला आहे. भारतीय संघासाठी संयुक्तपणे कसोटी क्रिकेटमध्ये यष्टिरक्षक फलंदाज म्हणून सर्वाधिक शतके करणारा पहिला क्रिकेटर बनला आहे. विशेष बाब म्हणजे त्याने देशाचा माजी दिग्गज कर्णधार एमएस धोनीची बरोबरी केली आहे. धोनीच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये एकूण ६ शतके आहेत. चेन्नई कसोटीच्या दुसऱ्या डावात शतक झळकावून पंतने आता कसोटी क्रिकेटमध्ये एकूण ६ शतके झळकावली आहेत. पण या शतकापूर्वी लंच ब्रेकमध्ये ऋषभ पंतने नेमकं काय केलं जाणून घ्या.**



ऋषभ पंतने दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात ८२ धावा केल्या होत्या. त्यानंतर लंचब्रेक झाल्याने पहिले सत्र संपले. या लंचब्रेकनंतर मैदानावर येत ऋषभ पंतने मोठे फटके मारत शतकाजवळ पोहोचला आणि त्यानंतर त्याने दोन धावा घेत शतक पूर्ण केले. पण या शतकापूर्वी लंच ब्रेकमधील एक व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.ऋषभ पंतचा सामन्यादरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये पंत ब्रेक दरम्यान ड्रेसिंग रूममध्ये हात जोडून बॅट, हेल्मेट आणि ग्लोव्ह्जची पूजा करताना दिसत आहे. पंतने लंचब्रेकनंतर मैदानावर येण्यापूर्वीचा हा व्हीडिओ आहे. मैदानात येण्यापूर्वी पंत बॅटसमोर हात जोडून उभा राहिला. यानंतर तो मैदानात आला आणि बांगलादेशी गोलंदाजांची धुलाई करत शतक पूर्ण केले. ६३३ दिवसांनंतर कमबॅक केल्यानंतर पंतने चांगली बॅट ग्लोव्हज समोर नतमस्तक होत त्याचे आभार मानले, अशा काही जणांनी कमेंट केल्या आहेत. १०९ धावांच्या खेळीत त्याने अनेक आकर्षक शॉट्स खेळले. यामध्ये त्याने आपल्या नेहमीच्या स्टाईलमधील एका हाताने षटकार मारला.दुसऱ्या डावात टीम इंडियाकडून चांगली फटकेबाजी पाहायला मिळाली. पंतने शुबमन गिलसह फटकेबाजी करत चांगली भागीदारी रचली. दोघांमध्ये चौथ्या विकेटसाठी १६७ धावांची भागीदारी झाली. पंतसोबत गिलनेही शतक झळकावले. ऋषभ पंतने कसोटीतील ५८ डावात ६ शतके झळकावली आहेत. माजी कर्णधार आणि अनुभवी यष्टीरक्षक महेंद्रसिंग धोनीने कसोटीतील १४४ डावांमध्ये ६ शतके झळकावली आहेत. ऋषभ पंतने या सामन्याच्या पहिल्या डावात ३९ धावा केल्या होत्या. या धावाही सामन्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाच्या होत्या. पंत फलंदाजीला आला तेव्हा भारताची धावसंख्या ३ विकेटवर ३४ धावा होती. विराट कोहली आणि रोहित शर्मासह शुबमन गिल पॅव्हेलियनमध्ये परतले होता. यानंतर पंतने येऊन यशस्वी जैस्वालच्या साथीने डावाची धुरा सांभाळली.ऋषभ पंतने दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात ८२ धावा केल्या होत्या. त्यानंतर लंचब्रेक झाल्याने पहिले सत्र संपले. या लंचब्रेकनंतर मैदानावर येत ऋषभ पंतने मोठे फटके मारत शतकाजवळ पोहोचला आणि त्यानंतर त्याने दोन धावा घेत शतक पूर्ण केले. पण या शतकापूर्वी लंच ब्रेकमधील एक व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.ऋषभ पंतचा सामन्यादरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये पंत ब्रेक दरम्यान ड्रेसिंग रूममध्ये हात जोडून बॅट, हेल्मेट आणि ग्लोव्ह्जची पूजा करताना दिसत आहे. पंतने लंचब्रेकनंतर मैदानावर येण्यापूर्वीचा हा व्हीडिओ आहे. मैदानात येण्यापूर्वी पंत बॅटसमोर हात जोडून उभा राहिला. यानंतर तो मैदानात आला आणि बांगलादेशी गोलंदाजांची धुलाई करत शतक पूर्ण केले. ६३३ दिवसांनंतर कमबॅक केल्यानंतर पंतने चांगली बॅट ग्लोव्हज समोर नतमस्तक होत त्याचे आभार मानले, अशा काही जणांनी कमेंट केल्या आहेत. १०९ धावांच्या खेळीत त्याने अनेक आकर्षक शॉट्स खेळले.दुसऱ्या डावात टीम इंडियाकडून चांगली फटकेबाजी पाहायला मिळाली. भारत-बांगलादेशमधील चेन्नई कसोटीत ६३३ दिवसांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणाऱ्या ऋषभ पंतने शानदार शतक झळकावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.भारतीय संघासाठी संयुक्तपणे कसोटी क्रिकेटमध्ये यष्टिरक्षक फलंदाज म्हणून सर्वाधिक शतके करणारा पहिला क्रिकेटर बनला आहेधोनीची बरोबरी केली आहे.शतक झळकावून पंतने आता कसोटी क्रिकेटमध्ये एकूण ६ शतके झळकावली आहेत.

### बांगलादेशी गोलंदाजांची धुलाई


ऋषभ पंतचा सामन्यादरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये पंत ब्रेक दरम्यान ड्रेसिंग रूममध्ये हात जोडून बॅट, हेल्मेट आणि ग्लोव्ह्जची पूजा करताना दिसत आहे. पंतने लंचब्रेकनंतर मैदानावर येण्यापूर्वीचा हा व्हीडिओ आहे. मैदानात येण्यापूर्वी पंत बॅटसमोर हात जोडून उभा राहिला. यानंतर तो मैदानात आला आणि बांगलादेशी गोलंदाजांची धुलाई करत शतक पूर्ण केले. ६३३ दिवसांनंतर कमबॅक केल्यानंतर पंतने चांगली बॅट ग्लोव्हज समोर नतमस्तक होत त्याचे आभार मानले, अशा काही जणांनी कमेंट केल्या आहेत. १०९ धावांच्या खेळीत त्याने अनेक आकर्षक शॉट्स खेळले.

# रोहितने बोलता बोलता शुबमनला मारलं

## रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा एक व्हिडिओ व्हायरल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताने बांगलादेशविरूद्धच्या पहिल्या कसोटीत बांगलादेशला ५१३ धावांचे लक्ष्य दिले आहे. भारताकडून शुबमन गिल आणि ऋषभ पंतने शतकं झळकावत टीम इंडियाला मोठी आघाडी मिळवून दिली. टीम इंडियाने पहिल्या डावात ३७६ धावा केल्या होत्या. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला.**




यामध्ये रोहित शर्मा शुबमन गिल, विराट कोहली, गौतम गंभीर, अभिषेक नायर हे सर्वजण डगआऊटमध्ये सामना पाहत बसले होते आणि त्याबरोबरच हे लोक मजामस्ती देखील करत होते. तितक्यात रोहितने गिलला बोलता बोलता त्याच्या जबड्यावर मारलं...सामन्याच्या दुसऱ्या डावाच्या सुरुवातीला टीम इंडिया फलंदाजी करत होती. यावेळी रविचंद्रन अश्विन आणि आकाश दीप फलंदाजी करत होते. सामना सुरू असताना कॅमेरा मध्येच टीम इंडियाच्या ड्रेसिंग रूमच्या दिशेने वळवला.

यादरम्यान रोहित गिलला काहीतरी समजावत होता आणि बोलता बोलता मस्करी करत शुबमनच्या हनुवटीवर मारलं. तितक्यात बाजूला बसलेल्या विराटने पाहिलं की कॅमेरा भारताच्या ड्रेसिंग रूमकडे वळवलेला आहे.

कोहलीने कॅमेरा पाहिल्यावर रोहितला सांगितले. चेन्नईमध्ये भारत आणि बांगलादेश यांच्यात खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्यादरम्यान इतरही अनेक मजा मस्तीचे क्षण पाहायला मिळाले. भारताच्या ड्रेसिंग रूममध्ये विराट कोहलीच्या बोलण्यावर गौतम गंभीर खळखळून हसताना दिसला.

### बांगलादेशला 513 धावांचे लक्ष्य

. फार क्वचित हसणारा गंभीर संघातील खेळाडूंबरोबर हसताना आणि मजा मस्ती करताना दिसला. तर सामना सुरू असताना बांगलादेशच्या डावात टीम इंडियाचा यष्टीरक्षक ऋषभ पंत रवींद्र जडेजाबरोबर मस्करी करत होता. याआधी सामन्याच्या पहिल्या दिवशी अशीच अनेक मजेशीर क्षण पाहायला मिळाली होती. भारताने बांगलादेशविरूद्धच्या पहिल्या कसोटीत बांगलादेशला ५१३ धावांचे लक्ष्य दिले आहे.